# प्रेसनोट

दिनांक– ०५/१०/२०१८.

## सफाळे, पालघर येथील मंडळ अधिकारी व तलाठयास लाच स्विकारताना अटक

दिनांक ०५/१०/२०१८ रोजी, तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय, सफाळे, पालघर येथील मंडळ अधिकारी **महेंद्र काशिनाथ संखे**, वय ५४ व तलाठी **सोपान बाब्रुवान पवार**, वय ४१ यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीचा ७/१२ उतारा व फेरफार तयार करून देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/–रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, पालघर यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, पालघर युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक तलाठी **सोपान बाब्रुवान पवार** यांना तक्रारदार यांच्याकडून १०,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले व मंडळ अधिकारी **महेंद्र काशिनाथ संखे** यांना ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री. अजय आफळे, पोलीस उप अधीक्षक, ॲसीबी, पालघर हे करत असुन त्यांचा संपर्क क्र. ९८७०१७४१९९ असा आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979 / 02525–297297**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner